# महाराष्ट्र शासन

**तातडीचे**
फोन नं२२०२६४८८-०२२.
Email id-ravindra.sawant84@nic.in

क्र.संकिर्ण-११/२०१६/प्र.क्र.१२५/अ-२
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक :- ६ डिसेंबर,२०१६

प्रति,

१) विभागीय आयुक्त,
कोकण/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सर्व जिल्हाधिकारी

विषय :- रेल्वे प्रकल्पांसाठी शासन निर्णय दि.१२.५.२०१५ व दि.३०.९.२०१५ च्या तरतूदीप्रमाणे खाजगी जमीन थेट खरेदीने ताब्यात घेण्याबाबतची कार्यपध्दती.

संदर्भ:- श्री.महेश के .गुप्ता, चिफ ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफिसर, रेल्वे, मुंबई यांचे पत्र क्र. EW/१८७/R/४६५/Land Acquisition, दिनांक ०३.११ .२०१६.

महोदय,

उपरोक्त विषयावरील मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना लिहीलेल्या संदर्भाधिन पत्रान्वये रेल्वे प्रकल्पांसाठी शासन निर्णय दि.१२.५.२०१५ व दि.३०.९.२०१५ च्या तरतूदीप्रमाणे खाजगी जमीन थेट खरेदीने ताब्यात घेण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत शासनास विनंती करण्यात आलेली आहे.

२. त्यानुसार रेल्वे विभागाची विनंती लक्षात घेऊन रेल्वे प्रकल्पांसाठी शासन निर्णय दि.१२.५.२०१५ व दि.३०.९.२०१५ च्या तरतूदीप्रमाणे खाजगी जमीन थेट खरेदीने ताब्यात घेण्याबाबतची कार्यपध्दती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे:-

१) रेल्वे प्रकल्पांसाठी थेट खरेदी पद्धतीने शासन निर्णय दि.१२.५.२०१५ व दि.३०.०९.२०१५ च्यामधील तरतूदीप्रमाणे खाजगी जमिनी ताब्यात घेण्यासाठी त्याप्रमाणेचा प्रस्ताव रेल्वे यंत्रणेने संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

२) संबंधित जिल्हाधिकारी यांनी वरील क्रमांक १ बाबत तपासणी करून सदर कार्यवाही करण्यासाठी त्यांच्या अधिनस्त अधिकाऱ्यांना प्राधिकृत करावे.

३) त्यानंतर संबंधित प्राधिकृत अधिकारी वर नमूद शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे संबंधित जमिनीच्या मूळ मालकाचा मूळ दस्ताऐवज व जमिनीचा लिगल सर्च रिपोर्ट प्राप्त करण्यासाठी कार्यवाही करील.

४) वरील क्र.३ बाबत खातरजमा झाल्यानंतर, प्राधिकृत अधिकारी यांनी रेल्वे यंत्रणेच्या सक्षम अधिकाऱ्यांसह संबंधित जमिनीची संयुक्त मोजणी करण्यात यावी.



Scanned by CamScanner

५) संयुक्त मोजणीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर, प्राधिकृत अधिकारी यांनी रेल्वे यंत्रणेच्या सक्षम अधिकाऱ्यांसह, संबंधित बाधीत शेतकऱ्यांसोबत बैठक आयोजित करून संमती प्राप्त करण्याची कार्यवाही करावी.

६) त्यानंतर शासन निर्णय दि.१२.०५.२०१५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने संबंधित जमिनीचे मुल्यांकन निश्चितीबाबत बैठक आयोजित करून कार्यवाही करावी.

७) संबंधित प्राधिकृत अधिकारी यांनी रेल्वे यंत्रणेस सदर जमिनीच्या खरेदीसाठीची रक्कम भरणा करण्यासाठी त्वरीत कळविण्यात यावी. सदर रकमेबरोबरच खरेदी खतासाठी नियमानुसार आवश्यक मुद्रांक व नोंदणी शुल्क तसेच इतर अनुषंगिक होणारा खर्च याचाही समावेश स्वतंत्रपणे करण्यात यावा.

८) रेल्वे यंत्रणेने जमिनीच्या खरेदीची कार्यवाही विनाविलंब होण्यासाठी संबंधित रक्कम त्वरीत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे भरणा करावी.

९) रेल्वे यंत्रणेने पूर्ण रकमेचा भरणा केल्यानंतर, संबंधित शेतकऱ्यांच्या जमिनीच्या खरेदी करणे. खरेदी खताची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी वा त्याचे प्राधिकृत अधिकारी यांची राहील. खरेदी खताची कार्यवाही झाल्यानंतर त्यानुसार राज्य शासनाचे नावे अधिकार अभिलेखात नोंदी घेण्यात याव्यात.

१०) संबंधित रेल्वे प्रकल्पासाठी आवश्यक त्या खाजगी जमिनीच्या खरेदी खताची कार्यवाही पूर्ण केल्यानंतर, संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने सदर जमीन रेल्वे यंत्रणेस हस्तांतरीत करण्यासाठी त्याप्रमाणेचे आदेश काढण्याची कार्यवाही तात्काळ करण्याची दक्षता घ्यावी.

११) जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित जमीन रेल्वे यंत्रणेकडे हस्तांतरित करण्याबाबतचे आदेश निर्गमित केल्यानंतर इतर महसूल यंत्रणेने अधिकार अभिलेखात त्याप्रमाणे नोंद घेण्याची कार्यवाही ७ दिवसांत करावी.

३. उपरोक्त नमूद कार्यपद्धतीचा अवलंब करून रेल्वे प्रकल्पांसाठीची आवश्यक खाजगी जमीन थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

आपला,

(सु. कि. गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

अपर मुख्य सचिव (परिवहन) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

सह सचिव (रेल्वे कक्ष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

श्री.महेश के. गुप्ता, चिफ ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफिसर, रेल्वे, दादाभाई नौरोजा रोड, ६वा मजला, मुंबई सि.एस.टी., मुंबई-०१

यांना माहिती व आवश्यक त्या तातडीच्या कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner